**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि. २५ ऑक्टोबर २०२२**

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५९२/२०२२ भादंविसक ३०२ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २३/१०/२०२२ रोजी २३.०० वा ते दि. २४/१०/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २४/१०/२०२२ रोजी १९.२३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | संगिता बसवराज गवंडी, वय- ४१ वर्षे, रा. प्लॉट नं. ३२, रमन नगर, वेलकम हॉलजवळ, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | आकाश बसवराज गवंडी, वय- २२ वर्षे, रा. प्लॉट नं. ३२, रमन नगर, वेलकम हॉलजवळ, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| **मयताचे नाव** | : | बसवराज लक्ष्मण गवंडी, रा. प्लॉट नं. ३२, रमन नगर, वेलकम हॉलजवळ, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादी या त्यांचे पती बसवराज व मुलगा आकाश याचे सोबत राहावयास आहेत. फिर्यादीचे पती व मुलगा आकाश दोघेजण गवंडीकाम करतात. फिर्यादीचा लहान मुलगा अभिषेक हा फिर्यादीचे माहेरी आजीकडे असतो. फिर्यादीचे पतीस दारुचे व्यसन आहे आणि तो फिर्यादीचे चारीत्र्यावर संशय घ्यायचा व आकाशला सारखा घरातुन बाहेर काढायचा. आकाश व फिर्यादीस नेहमी दारु पिऊन शिव्या द्यायचा व आकाशला सारखा घरातुन बाहेर काढायचा. फिर्यादी या चारदिवसांपुर्वी फिर्यादीचे माहेरी शाहिरवस्ती, भवानी पेठ, सोलापूर येथे गेल्या होत्या आणि फिर्यादीचे पती व फिर्यादीचा मुलगा आकाश हे दोघेजण वरील ठिकाणी होते. तरी, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी राहत असलेल्या ठिकाणी यातील फिर्यादीचे पती(वरील मयत) यांना वरील आरोपीताने कशानेतरी डोक्यात मारुन त्यांना जिवे मारले आहे म्हणून फिर्यादीची वरील आरोपीताविरुध्द तक्रार आहे. तपास:- वपोनि/ माने - ८१०८६७५०५० |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५८६/२०२२ भादंविसक ३२४,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २४/१०/२०२२ रोजी १०.०० वा चे सुमारास, रुपाभवानी मंदिर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २४/१०/२०२२ रोजी १७.०९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विराज हुसेनी कांबळे, वय- २३ वर्षे, रा. रमाबाई नगर, कडबा बाजार, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) आबा शिंदे, रा. रविवार पेठ, २) अनोळखी इसम नाव पत्ता माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे मित्रासह वरील ठिकाणी बोलत थांबले असताना, तेथे फिर्यादीच्या ओळखीचा वरील आरोपीत क्रं. १ व आरोपीत क्रं. २ हे आल्याने फिर्यादीचा मित्र पळुन गेला तेव्हा त्याचे सोबत का बोलत थांबला म्हणून वरील आरोपीतांनी फिर्यादीस कोयत्या सारख्या व इतर धारदार वस्तुने व लाकडी काठीने फिर्यादीस मारुन जखमी केले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ५०२ ओहळ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५३०/२०२२ भादंविसक ३४१,३२३,३२५,३२६,१४३,१४७,१४८,१४९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २१/१०/२०२२ रोजी १६.३० वा चे सुमारास, आय एम एस शाळेजवळ, जुळे सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २४/१०/२०२२ रोजी १९.२० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विलास भाऊसाहेब देशपांडे, वय- ५१ वर्षे, रा. ८२/१, स्वामी विवेकानंद नगर भाग- १, ओम गर्जना चौक, जुळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) महेश गाडे, २) गौतम पवार, ३) आकाश भोसेले, व इतर अनोळखी ४ |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे वरील ठिकाणाहुन जात असताना तीन गाडयावर एकुण ७ अनोळखी इसमांनी त्याचे हातातील कोयता व कुऱ्हाडीने |

| | | |
|---|---|---|
| | | फिर्यादीस मारहाण करुन फिर्यादीस व मुलगा अभिषेक यास जखमी केले आहे. तसेच वरील आरोपीत क्रं. १ हा कंपनीत सॅम्पलर चे काम करतात व आरोपीत क्रं. १ हा कॉन्ट्रॅक्टर आहे. कंपनीत येणारा माल हा पहिल्यांदा ते तपासणी करतात व त्यानंतर फिर्यादीकडे तपासणी करीता येतो तो माल तपासणी केल्यानंतर व्यवस्थित वाटला व योग्य वाटल्यास तो फिर्यादी पुढे पाठवितात व खराब माल रिजेक्ट करतात त्यामुळे कंपनी मध्ये प्रामाणिक कामामुळे व काम करण्याच्या पध्दतीवर लोक नाराज असुन फिर्यादीचा वरील आरोपीत यांच्या वर दाट संशय आहे म्हणून. तपासः- पोसई/ शेख- ९९२३७०१९६६ |